# पूज्य साने गुरुजी सार्वजनिक मोफत वाचनालय



गडहिंग्लज नगरपरिषद, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर. पिन - ४१६ ५०२.

☎ (०२३२७) २२२२४५ ● फॅक्स : ०२३२७-२२२२१०

E-mail - cogmc@rediffmail.com Website : wwwgadhinglajpalika.org


दिनांक :- २१ डिसेंबर २०१६

**प्रति,**
**मा.मेघा पानसरे.**
**कोल्हापूर.**

**विषय :- " डॉ.नरेंद्र दाभोळकर कृतज्ञता सामाजिक चळवळ पुरस्कार " स्विकारणेबाबत...**

महोदया,

गडहिंग्लज नगरपरिषद पूज्य साने गुरुजी सार्वजनिक वाचनालयामार्फत विविध विचारसंबंधीचे बहुमुल्य विचार लोकशिक्षण व्याख्यानमालेच्या माध्यमातून शहरवासियांचे पर्यत पोहचविण्याचे कार्य गेली **३७ वर्षे** अखंड पणे करीत आहे.पूज्य साने गुरुजींच्या नावांने सुशोभित असलेल्या वाचनालया मार्फत दरवर्षी त्यांच्या जयंती काळात **लोकशिक्षण व्याख्यानमाला** आयोजित करण्यात येत असते.चालू वर्षी व्याख्यानमाला **१८ डिसेबर २०१६ ते २४ डिसेबर २०१६** या काळात आयोजित केली आहे.

सदर व्याख्यानमाले मध्ये शनिवार दिनांक २४ डिसेंबर २०१६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता पूज्य साने गुरुजी साहित्य पुरस्कार , पूज्य साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार, आदर्श वाचक पुरस्कार व डॉ.नरेंद्र दाभोळकर कृतज्ञता सामाजिक चळवळ पुरस्कार देण्यात येणार आहे.

चालू वर्षाच्या **डॉ.नरेंद्र दाभोळकर कृतज्ञता सामाजिक चळवळ पुरस्कारा** करीता आपली निवड करण्यात आली आहे. तरी आपण पुरस्कार स्विकारणेसाठी **शनिवार २४ डिसेंबर २०१६** रोजी सायंकाळी ६.३० वाजता नगरपालिका कार्यालयात हजर रहावे ही विनंती,

कळावे

**(सौ.स्वाती महेश कोरी )**
नगराध्यक्ष
गडहिंग्लज नगरपरिषद गडहिंग्लज

**Muktangan Mitra**
'Krishna', Patrakar Nagar, Pune - 411016.
ISO 9001-2008
www.muktangan.org
muktangancorporate@gmail.com

Reg. Under M.P.T.-1950
No E-1242 (Pune)

**MUKTANGAN REHABILITATION CENTRE : Mohanwadi, Pune-Alandi Road, Yerwada, Pune - 411006.**
Phone : 020 - 2669 7605 / 6401 4598 Fax : 2668 3271

**MM/LETR/336 /18-19** **८ जानेवारी, २०१९**

**श्रीमती मेघा पानसरे,**

सप्रेम नमस्कार,

मुक्तांगणच्या संस्थापक डॉ. अनिता अवचट यांचा १० फेब्रुवारी हा स्मृतिदिन असतो. यानिमित्त दरवर्षी दोन व्यक्तींना संघर्ष सन्मान पुरस्कार देण्यात येतात.

कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्येनंतर आपण करत असलेल्या संघर्षाची दखल घेऊन यावर्षीच्या पुरस्कारासाठी आपली निवड करण्यात आली आहे. आपले मन:पूर्वक अभिनंदन. मानचिन्ह व रु. २०,०००/- असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

हा पुरस्कार स्वीकारण्यास आपण अनुमती दिलीत याबद्दल विश्वस्त मंडळातर्फे मी आपले आभार मानते. पुरस्कार प्रदान सोहळा रविवार दिनांक १० फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता एस.एम. जोशी सभागृह, नवी पेठ, पुणे - ३० येथे होणार आहे.

जेष्ठ रंगकर्मी सतीश आळेकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत.

डॉ. आनंद नाडकर्णी आपल्याशी संवाद साधतील.

आपल्या परिवारासह या कार्यक्रमाला उपस्थित रहावे ही विनंती.

कृपया आपले छायाचित्र व बायोडेटा पाठवावा.

आपली नम्र,

मुक्ता पुणतांबेकर
विश्वस्त

Scanned by CamScanner